Process Safety Beacon

http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx

उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

CCPS च्या समर्थकांकडून प्रायोजित

ऑक्टोबर २०१०

# घातक रसायन साठा आणि वाहतूक













आपल्या संयंत्रातील प्रत्येकाने मालाचे उत्पादन सुरक्षितपणे करण्यासाठी काळजीपूर्वक काम केले आहे तथापि तुमची प्रक्रीया सुरक्षा इथे संपत नाही! तुम्ही तयार केलेली उत्पादने, उप–उत्पादने, घातक घनकचरा तुम्ही कसा साठवून ठेवता? तुमच्या ग्राहकाकडे किंवा घनकचरा विल्हेवाटीच्या सुविधेकडे सुरक्षितपणे कसा वाहतूक करता? यातही काही चुकीचे घडू शकते – चित्रे काही उदाहरणे दर्शवितातः

१. एका गोदामात घातक घनकचऱ्याचे एक पिंप असंयोज्य पदार्थाने संदूषित झाले व अभिक्रीया झाली, पिंपाचा स्फोट झाला व ते छतातून बाहेर उडून गोदामाच्या छतावर पडले.

२. ज्वालाग्राही पदार्थाने भरलेल्या एका गळत्या आय् एस् ओ टँकरला मार्गावर आग लागली.

३. एक अभिकारक एककार्बनी संयूग चुकीचे अंतरावरण असलेल्या मालगाडीच्या वाघीणीमध्ये भरले गेले जे नंतर वाघीणीच्या लोखंडाबरोबर संदूषित झाले आणि त्याचे बहूकार्बनीकरण होऊन पर्यवसान वाघीणीच्या स्फोटात झाले.

४. अव्यवस्थितपणे बांधलेल्या वापरलेल्या लिथियम बॅटरींना विल्हेवाटीच्या ठिकाणी वाहून नेत असताना आग लागली.

## आपण काय करु शकता ?

- मालाचे परिवहन करताना नमून्याच्या लहान बरण्यांपासून ते मालगाडीच्या वाघीणी आणि मोठ्या कंटेनरवर व्यवस्थित लेबल लावले असल्याची खात्री करा म्हणजे त्यांत काय आहे ते प्रत्येकाला सहज समजेल.
- प्रयोगशाळेतील आणि संयंत्रातील कचऱ्याच्या डब्यांवर त्यांत कोणता कचरा टाकावा व कोणता टाकू नये याच्या वर्गवारीचा कागद लावा.
- आपल्या कार्यक्षेत्रात बांधून ठेवलेला कचरा फार दिवस साठवून टेवू नका.
- मालाचे परिवहन करण्याची तयारी करताना मालाची सुरक्षित वाहतूक करण्याच्या दृष्टीने योग्य पात्र, बांधणी, लेबलींग, वाहतुकीची कागदपत्रे व इतर गरजांची पूर्तता करण्याविषयी आपणास माहिती असल्याची खात्री करा.
- घातक पदार्थांनी कंटेनर्स भरण्यापूर्वी त्यांची तपासणी करा. संभाव्य गळतीची ठिकाणे शोधा.
- गोदामांत आणि साठा क्षेत्रात माल सुरक्षितपणे साठवण्याच्या आवश्यकतांची माहिती घ्या आणि त्यांचे पालन करा.
- तुमच्या संयंत्राच्या वाहतुकीची कागदपत्रे व कंटेनर्सची लेबल्ससह माल उतरवून घेण्याच्या पद्धतींचे तसेच एखादा खराब किंवा गळका कंटेनर कसा हाताळावा यांच्या पद्धतींचे पालन करा
- तुमच्या कारखान्यात एखादा खराब किंवा गळका कंटेनर आढळून आल्यास त्वरीत त्याची माहिती द्या म्हणजे दुरुस्तीची कामे करून घेता येतील.

**घातक पदार्थांचा साठा आणि परीवहन सुरक्षितपणे करा!**

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणी पुनर्विक्री करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org or २१२.५९१.७३१९

हे बीकॉन सहसा अफ्रीकन, अरेबिक, चिनी, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, हिंदी, हंगेरियन, इंडोनेशियन, इटालियन, जपानी, कोरियन, मालय, मराठी, नॉर्वेजियन, पर्शियन, पोलीश, पोर्तुगीज, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तमिळ, थाई, तेलगू, तुर्की, उर्दू आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे.

This Beacon is translated in Marathi by Mr. S.K. Gulawani, Maharashtra, India.